IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 2, October 2024

# जैन राजकीय इतिहास : एक दृष्टीक्षेप

**डॉ. हर्षवर्धन प्रतिभाताई शंकर यादव**

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, दत्त द्वारका महाविद्यालय, वाकरे, जि. कोल्हापूर

harshavardhanyadav11@gmail.com

- **युगलिक व कुलकर व्यवस्था**

मानवी सभ्यतेच्या सुरुवातीला 'युगलिक व्यवस्था' होती. नर आणि मादीची अनेक जोडपी होती. प्रत्येक जोडपे नवीन अपत्यांना जन्म देई आणि ही युगलिक प्रक्रिया चालू राही.त्यांच्या जीवनातील अन्न, वस्त्र, निवारा या सर्व गरजा वृक्षांमुळे (कल्पवृक्ष) पूर्ण होत. वृक्ष विपुल प्रमाणात असल्याने गरजा पूर्ण करण्यासाठी संघर्ष नव्हता. प्रत्येकजण आनंदी होता. त्यामुळेच शास्त्रकारांनी या युगाला 'भोगभूमी' म्हटले. त्यावेळी कुटुंबव्यवस्था, गावे, शहरे नव्हती; त्यावेळचे राजकारण, समाजकारण आणि धर्मकारण इतपतच होते.

युगलिक व्यवस्थेनंतर विकसित झालेल्या व्यवस्थेला शास्त्रकारांनी 'कुलकर व्यवस्था' म्हटले आहे. अनेक जोडपी एकत्र राहू लागली. त्यामुळे कुल बनले, संतती वाढली. कल्पवृक्षाद्वारे जीवन गरजा पूर्ण होण्यात अडचणी निर्माण होऊ लागल्या. तेव्हा कुलकरांनी आयुष्य प्रवासात पुढे वाटचाल करण्याचे नवे मार्ग शोधले. निसर्गाचे स्वरूप समजून घेतले. संघर्ष टाळण्यासाठी कल्पवृक्षाच्या सीमा निश्चित केल्या. शेती-पशुपालनास सुरवात केली. संघर्ष आणि गुन्ह्यासाठी शिक्षेचे स्वरूप निश्चित केले गेले. जीवन सुरक्षित झाले.कुलकर हे या व्यवस्थेचे केंद्र होते. ते मार्गदर्शन, सुव्यवस्था आणि शिस्तीचे सूत्रधार होते.कुल म्हणून एकोप्याने जगण्याच्या प्रेरणेमुळे त्यांना 'कुलकर' म्हटले जाई.ही 'कुलकर प्रणाली' पुढे राजेशाहीत विकसित झाली. या विकासयात्रेला हजारो वर्षे लागली.

डॉ. नेमिचन्द्रशास्त्री यांनी 'आदिपुराणा'च्या आधारे 'कुलकर संस्थे'चे पुढील निष्कर्ष मांडले आहेत –

'कुलकर संस्था' ही समाजव्यवस्था राखणारी एक प्रकारची संस्था आहे. एकूणच, ती जीवन मूल्यांचे नियमन करून एकता आणि नियमितता प्रदान करते. गुन्ह्यांचे किंवा चुकांचे निवारण दंड पद्धतीशिवाय शक्य नाही. म्हणून, कार्ये आणि क्रियाकलाप नियंत्रित करण्यासाठी शिस्त स्थापित करण्यात येते. या 'कुलकर संस्थे'चे विकसित स्वरूप म्हणजेच राज्यसंस्था, ज्यामध्ये समाज आणि राजकारण या दोन्ही घटकांचा समावेश आहे.

आदिपुराणानुसार, कुलकर संस्थेने साधारणपणे पुढील कार्ये केली आहेत -

1. समाज सदस्यांमध्ये संबंध प्रतिस्थापना.
2. संबंधांचे उल्लंघन करणाऱ्यांसाठी दंड प्रणाली निर्धारण.
3. स्वाभाविक व्यवहार संपादन करण्यासाठी कार्यपद्धतीचे प्रतिपादन.
4. उपजीविका, चालीरीती आणि सामाजिक नियमांचे स्पष्टीकरण.
5. सांस्कृतिक साधनांद्वारे निरोगी वैयक्तिक जीवन निर्मितीबरोबरच सामाजिक जीवनात शांतता आणि समतोल प्रस्थापित करण्यासाठी सुखाच्या संकल्पनांमध्ये बदल.
6. सामाजिक संघटना आणि विविध प्रवृत्तींची स्थापना.
7. सामूहिक कृतींचे नियंत्रण आणि सामाजिक कल्याणाचे प्रतिपादन.

कुलकरांच्या दंडनीतीचे जे वर्णन आहे त्यानुसार, त्यांच्या दंडनीतीचा विकास पुढीलप्रमाणे आहे -

1. ‘हा’कार- जेव्हा कोणी मर्यादेचे उल्लंघन करतो तेव्हा त्याला ‘हाकार’ ही शिक्षा दिली जाते. याचा अर्थ “हा! तू हे काय केलंस?” असे बोलून गुन्हेगाराची निंदा केली जाते.
2. ‘मा’कार-या दंडनीतीअंतर्गत गुन्हेगाराला भविष्यात असा प्रकार न करण्याचा इशारा देण्यात येतो.
3. ‘धिक्’कार - या अंतर्गत गुन्हेगाराचे तीव्र पृथक्करण केले जात असे.

जिनसेन यांनी लिहिले आहे की, पूर्वी फक्त ‘हाकार’ वापरला जात असे. त्यानंतर ‘हाकार’ आणि ‘माकार’ वापरला जाऊ लागला आणि त्यानंतर ‘हाकार’, ‘माकार’ आणि ‘धिक्कार’ वापरला जाऊ लागला.

ज्या वेळी ‘कुल’ तयार झाले आणि कुलकर पद्धती सुरू झालीकिंवा जोपर्यंत ही व्यवस्था चालू राहिली, तोपर्यंत संपूर्ण मानव समाज एका कुलाच्या रूपात संघटित झाला आणि त्याचे प्रमुख कुलकर असे म्हटले गेले. ही व्यवस्था दीर्घकाळ क्रमशः 14 कुलकर चालू राहिली, हे मान्य करणे कठीण वाटते कारण असे दिसते की,‘युगलिक व्यवस्थे’नंतर मानवी समूह अनेक लहान कुलांमध्ये संघटित झाला आणि त्या कुलांच्या प्रमुखांना कुलकर म्हटले गेले.बहुधा अनुभव आणि ज्ञानाच्या विपुलतेमुळे मुख्यतः वृद्ध व्यक्ती त्यांच्या कुलाचे प्रमुख होते. विशेष परिस्थितीत, कुलातील विशेष सामर्थ्य असलेल्या व्यक्तीला देखील कुलकर म्हणून स्वीकारले जाई.कुलाची देखभाल, संरक्षण, शिस्त इत्यादींसाठीही तो जबाबदार असे.

- **ऋषभदेवांची राजेशाही**

कुलकर व्यवस्थेनंतर जैन साहित्यात राजकारणाचे स्वरूप स्पष्टपणे राजेशाहीचे आहे. पहिले तीर्थंकर ऋषभदेव यांचे वडील नाभिराय हे शेवटचे कुलकर होते. त्यांच्या नावाशी संबंधित ‘राय’ हा शब्द बहुधा ते राजा असल्याचे सूचित करते. ते त्या राज्याचे नाभि (मध्यभागी) होते.

नभिराय यांनी आपला मुलगा ऋषभ यांस आपला उत्तराधिकारी बनवले. औपचारिकपणे नियुक्त होण्यापूर्वीच, नाभिराय अनेक बाबी ऋषभांकडे पाठवत असत.ऋषभ यांनी गावे, शहरे इत्यादींची व्यवस्था केली, तसेच शेती, व्यापार इत्यादींचा सम्यक विनियोग केला.

आचार्य हस्तीमल जी यांनी ऋषभ यांच्या प्रशासकीय व्यवस्थेचा तपशील ‘आवश्यकनियुक्ति’च्या आधारे पुढीलप्रमाणे दिला आहे –

“राज्याभिषेकानंतर, ऋषभदेवांनी राज्याच्या कल्याणासाठी आणि विकासासाठी पहिले सुरक्षा दल स्थापन केले. त्याचे अधिकारी ‘उग्र’ नावाने ओळखले जावू लागले. नंतर राजकीय व्यवस्थेत सल्लामसलत करण्यासाठी एक मंत्रिमंडळ निर्माण केले गेले, ज्याचे अधिकारी ‘भोग’ म्हणून ओळखले जाऊ लागले. याशिवाय एक सल्लागार मंडळ स्थापन केले गेले, जे सम्राटाच्या जवळ राहून वेळोवेळी सल्ला देत असे. सल्लागार मंडळाच्या सदस्यांना ‘राजन्य’ आणि सामान्य कर्मचाऱ्यांना ‘क्षत्रिय’ म्हणून संबोधले जाऊ लागले. राज्याचे विरोधी घटकांपासून संरक्षण करण्यासाठी आणि दुष्टांना शिक्षा करण्यासाठी त्यांनी चार प्रकारचे सैन्य आणि सेनापतींची व्यवस्था केली. गुन्हेगाराचा शोध आणि गुन्हेगारी रोखण्यासाठी साम, दाम, दंड व भेदनीती आणि खालील चार प्रकारची दंडव्यवस्था योजण्यात आली -

1. परिभाषण - गुन्हेगाराला काही काळ आक्रोशपूर्ण शब्दात दंड करणे.
2. मन्डली बन्ध - गुन्हेगाराला काही काळ मर्यादित क्षेत्रात थांबवून ठेवणे.
3. चारक बन्ध - गुन्हेगाराला कारागृहासारख्या ठिकाणी बंदिस्त ठेवणे.
4. छवि विच्छेद - गुन्हेगाराच्या हात-पाय सारख्या शरीराच्या कोणत्याही भागाचे छेदन करणे.”

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 2, October 2024

- **भरत राजाचे सार्वभौम राज्य**

ऋषभ यांना शंभर पुत्र होते. निवृत्त होण्यापूर्वी त्यांनी प्रत्येकाला एक प्रशासकीय एकक सोपवले. ज्यांना संन्यासाचा मार्ग रुचकर वाटला, ते वडिलांसह संन्यासी झाले, बाकीच्यांनी आपापल्या कारभाराची सूत्रे हाती घेतली.

ऋषभ यांच्या मुलांमध्ये भरत सर्वात जेष्ठ होते. यांच्या दुसऱ्या आईच्या मुलांमध्ये बाहुबली सर्वात मोठे होते. वडिलांच्या पश्चात भरत यांच्या मनात आले की, आपल्या वडिलांप्रमाणे तेच सत्तेचा केंद्र असावेत आणि इतर सर्वांनी त्यांचे सार्वभौमत्व स्वीकारले पाहिजे.आपल्या सार्वभौमत्वाचा प्रचार आणि बळकटीकरण करण्याच्या उद्देशाने भरत चौफेर फिरले. त्यांचा हा प्रवास 'दिग्विजय' मानला गेला. बाहुबली वगळता सर्वांनी भरत यांचे सार्वभौमत्व स्वीकारले. बाहुबली म्हणाले, "वडिलांनी आम्हाला समान अधिकार आणि स्वातंत्र्य दिले आहे. आम्ही कोणाच्याही अधीन राहू शकत नाही." भरत सत्तेच्या प्रभावाखाली होते. त्यांनी बाहुबलींना लढाईचे आव्हान दिले.तीन प्रकारच्या निर्णायक लढाया झाल्या - जलयुद्ध,दृष्टीयुद्ध,कुस्तीयुद्ध.तिन्हींमध्ये बाहुबली विजयी झाले.सत्तेसाठी भरत हिंसेकडे झुकले. त्यांनी बाहुबलींवर चक्र फेकले. यामुळे बाहुबली जखमी झाले नाहीत परंतु त्यांच्या मनाला इजा झाली.सत्तेसाठी त्यांनी हिंसेच्या प्रतिकारात सर्वस्वाचा त्याग केला आणि संन्यासी झाले.भरत चक्रवर्ती राज्यकर्ता झाले.

भरत-बाहुबली युद्ध, ही जैन राजकारणाच्या इतिहासात सत्तेसाठी संघर्ष आणि संघर्षात पराभव झाल्यास अन्याय व हिंसाचाराचा अवलंब करण्याची पहिली घटना आहे.

- **जैन प्रजासत्ताक राजकारण**

संपूर्ण भारतीय राज्यशास्त्राच्या इतिहासाच्या दृष्टीकोनातूनही जैन राजकारणातील 'प्रजासत्ताक'चा उल्लेख महत्त्वाचा आहे.जैन धर्माचे चोविसावे तीर्थंकर महावीरांच्या काळात, म्हणजे इसवी सन पूर्व सहाव्या शतकात, वैशालीमध्ये एक समृद्ध प्रजासत्ताक होते. याचे स्पष्ट चित्र 'दीघनिकायपालि'त उपलब्ध आहे.

महात्मा बुद्धांना विचारण्यात आले, 'वैशालीवर विजय कसा मिळवता येईल?'उत्तरात बुद्ध म्हणाले, 'जोपर्यंत या प्रजासत्ताकाचे सदस्य सात गोष्टींचे पालन करत राहतील तोपर्यंत वैशालीवर विजय मिळवता येणार नाही.' त्या सात गोष्टी पुढीलप्रमाणे-

1. संमती साठी सभेमध्ये एकत्र येणे.
2. एक होऊन बसणे, एक होऊन उठणे आणि एक होऊन कार्य करणे.
3. अप्रज्ञावंतांना प्रज्ञावंत न मानणे आणि प्राचीन वज्जी धर्माचे पालन करणे.
4. आपल्या वयोवृधांचा आदर करणे.
5. स्त्री वर्गाच्या सन्मानाचे रक्षण करणे.
6. आपल्या चैत्यांची पूजा करणे.
7. अर्हतांच्या निवासाची सुविधाजनक आणि सुरक्षित व्यवस्था करणे.

वैशाली प्रजासत्ताकात वज्जी आणि लिच्छवी यांच्या नऊ राज्यांचा समावेश होता. याचे संचालन करणाऱ्या सभेला 'वज्जियान राजसंघ' असे म्हणत. चेतक हे या प्रजासत्ताकाचे अध्यक्ष होते.

मगधची शक्तिशाली राजेशाही वैशालीला लागून असूनही, वैशालीचा प्रभाव आणि प्रतिष्ठा अफाट होती.वैशालीशिवाय त्या वेळी इतरही काही गणराज्ये होती. शाक्य गणराज्याचे अध्यक्ष शुद्धोधन होते. त्याची राजधानी कपिलवस्तु होती.मल्लांच्या प्रजासत्ताकाच्या कुशीनारा आणि पावा या राजधान्या होत्या. इतरही काही छोटी प्रजासत्ताके होती.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 2, October 2024

त्या संघामध्ये समाविष्ट असलेल्या राज्यांचे स्वातंत्र्य, निर्णयांमध्ये विचारांची देवाणघेवाण आणि एकमेकांबद्दल मैत्री व आदर हे प्रजासत्ताकांचे वैशिष्ट्य होते.

- **धार्मिक व तात्विक विचारांचा राजकारणावरील प्रभाव**

महावीरांच्या काळापर्यंत, भोगभूमीच्या 'युगलिक पद्धती'पासून 'प्रजासत्ताक'पर्यंतच्या राजकारणाच्या विकासात धार्मिक आणि तात्त्विक विचारांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. तीर्थंकरांनी प्रत्येक जीवाच्या स्वतंत्र शक्तीचे प्रतिपादन करून व्यक्तिस्वातंत्र्याला जो आदर दिला, त्यामुळे विचारवंतांना 'श्रावकाचार'ची विशेष आचारसंहिता विकसित करण्याची नवी दृष्टी मिळाली.

'अनेकांत'च्या विचाराने एकमेकांच्या विचारांचा आदर करण्याचा आणि 'स्याद्वाद'ने अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे नियमन करण्याचा मार्ग मोकळा झाला.

पार्श्वनाथांच्या 'चाउज्जाम संवर' आणि महावीरांच्या 'पंचव्रता'ने समाजात सुव्यवस्था आणि समान वितरणावर भर दिला. शासक आणि शासित या दोघांनाही त्यांच्या मर्यादांची जाणीव करून दिली. विविध संदर्भात आलेले संदर्भराजकारणाच्या संदर्भातही महत्त्वाचे आहेत. 'दशवैकालिक' मध्ये एके ठिकाणी लिहिले आहे की,ज्याप्रमाणे भ्रमर फुलांचा रस घेऊन स्वत:चा उदरनिर्वाह करतो, पण फुलाला कोणत्याही प्रकारे इजा होऊ देत नाही, त्याचप्रमाणे शासनाने जनतेकडून त्याचा वाटा उचलला पाहिजे.

जैन राजकारणात हिंसाचाराचा आश्रय घेण्याचा उल्लेख कोठेही नाही आहे. अनैतिकतेचा आश्रय घेण्यास देखील परवानगी नाही आहे. भरत यांच्या या दोन्ही कार्याची शास्त्रकारांनी निंदा केली आहे.

- **आदिपुराणाचे विशेष संदर्भ**

जिनसेन (नववे शतक) यांनी लिहिलेल्या 'आदिपुराणा'त मांडलेले राज्यशास्त्र हे डॉ. नेमिचन्द्र शास्त्री यांनी गुप्त वंशाचा सम्राट दुसरा चंद्रगुप्त विक्रमादित्य यांचे राज्य मानले आहे. थोडक्यात, असे म्हणता येईल की, आदिपुराणात मांडलेला राजकीय सिद्धांत हा पौराणिक, गुप्त वंशीय आणि राष्ट्रकूट राजकारणाचे एकत्रित रूप आहे.

जैन राजकारणाच्या दृष्टिकोनातून आदिपुराणातील काही विशेष संदर्भ पुढीलप्रमाणे आहेत-

राजाचे वृत्त –

जिनसेन यांनी राजाचे वृत्त (धर्म) पाच प्रकारचे सांगितले आहेत:

1. कुलानुपालन: कुलाम्नाय (कुल परंपरा) आणि कुलोचित (कुलाला शोभणारे) वृत्तांचे जतन करणे.
2. मत्यनुपालन: लोक-परलोक, हित-अहिताचा विवेक.
3. आत्मानुपालन: या जगाच्या आणि परलोकाच्या संबंधी अपायांपासून आत्म्याचे रक्षण करणे.
4. प्रजानुपालन:गुराख्यांद्वारे गोरक्षणाचा दृष्टांत प्रजानुपालनाची व्याख्या विस्तृत करतो.
5. समंजसत्व: वाईटाला आवर घालणे (दुष्टनिग्रह) आणि विनयशीलतेचे पालन करणे (शिष्ट अनुपालन).

परलोकाच्या/मृत्यूनंतरच्या परिणामांपासून सुटण्याचा एकमेव मार्ग म्हणजे धर्म होय.राजाच्या स्वभावाचे आणि कर्तव्यांचे वरील वर्णन हे जैन राजकारणाच्या दृष्टिकोनातून आदर्श राजा किंवा राज्यप्रमुखाच्या व्यक्तिमत्त्वाचे उदाहरण आहे.

प्रजेच्या हेतूंचे मूल्यमापन –

राजेशाहीत, राज्याच्या विविध अंगांद्वारे -अमात्य, पुजारी इत्यादींद्वारे प्रशासनात प्रजेच्या हेतूंचे/मतांचे मूल्यमापन केले जाते.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 2, October 2024

युद्धाचा अहिंसक प्रतिकार –

जिनसेन हे युद्धाचे संपूर्ण विरोधक आहेत कारण युद्ध हे अनेक लोकांच्या विनाशाचे कारण असते. त्यात अनेक तोटे असून ते भविष्यासाठी क्लेशदायक असते. म्हणून काहीतरी देऊन बलाढ्य शत्रूशी तह/करारकेला पाहिजे.

कठोर शिक्षेवर बंदी –

जिनसेन जास्त कठोर शिक्षेची शिफारस करत नाहीत. ते म्हणतात की, ज्याप्रमाणे गाईंच्या कळपातील एखाद्या गायीने गुन्हा केला तर गोपालक तिला विच्छेदनासारखी कठोर शिक्षा देत नाही, उलट तिच्यावर नियंत्रण ठेवून तिचे रक्षण करतो,त्याचप्रमाणे राजानेही आपल्या प्रजेचे रक्षण करावे.

- **सोमदेव सुरीचे नीतिवाक्यमृत**

कौटिल्य यांच्या अर्थशास्त्रानंतर, सोमदेव सुरी यांचा नीतिवाक्यमृत हा राज्यशास्त्रावरील अद्वितीय ग्रंथ आहे. हा सूत्रांमध्ये रचला गेला असून एकूण बत्तीस प्रकरणांमध्ये विभागला गेला आहे. कौटिल्य यांच्या अर्थशास्त्राच्या तुलनेत हा ग्रंथ संक्षिप्त, सोपा आणि सहज समजण्याजोगा असल्याने, दहाव्या शतकापासून दीर्घकाळ तो राजांसाठी खरा मार्गदर्शक ठरला आहे.

सोमदेव यांनी त्यांच्या 'यशस्तिलक' या काव्यग्रंथातही राजकारणाचे तपशीलवार वर्णन केले आहे, परंतु नीतिवाक्यमृत हा या विषयावरील स्वतंत्र ग्रंथ आहे. हा ग्रंथ ज्या वेळी रचला गेला त्या वेळी याची नितांत गरज होती. सम्राट हर्षवर्धन यांच्या नंतर भारताची अनेक छोट्या राज्यांमध्ये विभागणी झाली. राजे आपल्या सत्तेचा दुरुपयोग करून आपापल्या राज्यांच्या सीमा वाढवत होते. या अराजकतेचा फायदा घेऊन यवनांनी भारताचा ताबा घेतला. अशा प्रसंगी सोमदेव यांनी नीतिवाक्यमृत रचून भारतीय राजांना मार्गदर्शन केले.

नीतिवाक्यमृत मध्ये शासन व्यवस्थेशी संबंधित सर्व पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला आहे. राज्यातील सप्तंग-स्वामी, अमात्य, जनपद, दुर्ग, कोश, बल आणि मित्र यांच्या वैशिष्ट्यांवर ज्वलंत प्रकाश टाकण्यात आला आहे. राजधर्माचेही विस्तारित स्पष्टीकरण व विवेचन केले आहे. सोमदेव हे स्वतः जैन भिक्षू होते. त्यामुळे त्यांनी आपल्या ग्रंथात जैन धर्माच्या उच्च आदर्शांची पुरेपूर काळजी घेतली आहे.

सोमदेव यांनी धर्मनिती, अर्थनिती आणि समाजनिती यास राजकारणाचे अविभाज्य अंग मानले आहे. यामुळे राजकारणाबरोबरच त्यांनी यावरही सविस्तर चर्चा केली आहे. डॉ. एम. एल. शर्मायांनी लिहिले आहे की, नीतिवाक्यमृत हेमानवी जीवनाचे विज्ञान आणि तत्वज्ञान आहे. हे खरे तर प्राचीन निती साहित्याचे सारभूत अमृत आहे. राज्य प्रशासन जे मनुष्याला त्याच्या मर्यादेत स्थिर ठेवते आणि जे त्याचे पालनपोषण, संवर्धन आणि संरक्षण करते त्या राजकीय घटकांचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून विश्लेषण यामध्ये आहे.

नीतिवाक्यामृतचे काही विशेष संदर्भ:

राज्याचे महत्त्व –

नीतिवाक्यामृत मंगलसूत्रात राज्य हे धर्म, संपत्ती आणि काम यांचे ध्येय साध्य करण्याचे एक अतुलनीय साधन आहे, म्हणून त्याला वंदन करण्यात आले आहे. दहाव्या शतकात राज्याला इतके महत्त्व देणारे हे एकमेव उदाहरण आहे.

धर्मनिरपेक्षता–

हजार वर्षांपूर्वी, धार्मिक संघर्षाच्या त्या काळात, सोमदेव यांच्यासारखा सक्षम विचारवंतच धर्मनिरपेक्षतेबद्दल बोलू शकतो. नीतिवाक्यमृताचा प्रथम समुद्देशधर्मसमुद्देश आहे.धर्मनिरपेक्षतेबाबत त्यांच्या धोरणाचे ज्ञान स्पष्ट होते; ते म्हणतात की, ज्याची ज्या देवतेवर श्रद्धा आहे त्याने त्याचा आदर केला पाहिजे.

राज्याचा अधिकारी –

सोमदेव यांनी क्रम आणि विक्रम या दोन्हीना राज्याचा संयोग म्हटले आहे. विक्रमाच्या अनुपस्थितीत क्रमगत राज्यही नष्ट होते. त्यांनी स्पष्टपणे लिहिले आहे की, जमिनीवर कोणाचाही कुलगत हक्क नाही, पण वसुंधरा वीरांद्वारे भोग्य असते.

निरंकुश शासनाचा निषेध –

सोमदेव राजेशाहीतही निरंकुश शासनाचे समर्थक नाहीत. त्यांच्या मते, मंत्रिमंडळाच्या मतांकडे राजाने कधीही दुर्लक्ष करू नये. त्याने आपल्या मंत्र्यांकडे दुर्लक्ष केले तर तो राजा म्हणवून घेण्याच्या पात्रतेचा नाही.

लोककल्याणकारी राज्य–

सोमदेव यांनी लोककल्याणकारी राज्याचा सिद्धांत मांडला आहे. समृद्ध राष्ट्राची कल्पना हा त्यांचा आदर्श आहे. जे प्राणी, धान्य, मृग इत्यादी संपत्तीने शोभते ते राष्ट्र होय. शेती, पशुपालन, व्यापार, वाणिज्य इत्यादी क्षेत्रात प्रगती कशी करता येईल यावर त्यांनी पुरेसा प्रकाश टाकला आहे.

सार्वजनिक धोरण व राजकारण–

सोमदेव यांनी सार्वजनिक धोरण आणि राजकारण यांचा समन्वय साधला आहे. समाजाच्या प्रगतीमध्येच राष्ट्राची प्रगती दडलेली असते. सार्वजनिक वर्तनाच्या दृष्टीकोनातून महत्त्वाची असलेली व्यवस्था सोमदेवांनी नीतिवाक्यामृतमध्ये पूर्णपणे स्पष्ट केली आहे.

वर्गविरहित राजकारण –

जरी सोमदेवांनी वर्णाश्रम व्यवस्थेचे वर्णन नीतिवाक्यामृतमध्ये केले असले तरी या विषयावरील त्यांची मते जैन परंपरेला अनुसरून अतिशय उदारमतवादी आहेत. त्यांनी लिहिले आहे की, ज्याप्रमाणे प्रत्येकजण सूर्याचे दर्शन घेऊ शकतो, त्याचप्रमाणे धर्म प्रत्येकासाठी आहे. ते म्हणतात की, आचार शुद्धता सर्वात महत्वाची आहे. ज्याचे आचरण शुद्ध आहे, ज्याच्या घरातील पात्र शुद्ध आहेत आणि जो शरीराने स्वच्छ आहे, अशा शूद्राला देव, द्विज आणि तपस्वी यांची सेवा करण्याचा अधिकार आहे. सदाचारतेचे पालन करणे हे प्रत्येकाचे सामाजिक कर्तव्य आहे.

राष्ट्रवादाचे महत्त्व–

सोमदेव यांनी लिहिले आहे की, राजाने शक्यतोवर राज्याच्या उच्च पदांवर केवळ स्वदेशवासियांचीच नियुक्ती करावी. स्वदेशवासियांमध्ये आपल्या राष्ट्राप्रती जास्त संलग्नता असते.

**निष्कर्ष -**

जैन राजकीय इतिहासामध्ये धार्मिक, आर्थिक आणि सामाजिक धोरणांचे एकत्रित रूप आढळून येते. धर्माला राजकारणापासून वेगळे केल्यास राष्ट्रीय चारित्र्याच्या विकासासाठी कोणताही स्पष्ट आधार राहत नाही. सामाजिक धोरणाकडे दुर्लक्ष झाल्यास समाजजीवनाच्या उन्नतीच्या शक्यता कमी होतात आणि आर्थिक धोरणाकडे लक्ष न दिल्यास समाज व राज्याच्या विकासाचा कणा कमकुवत होतो. जैन राजकारण लौकिक आणि अध्यात्मिकसर्वांगीण विकासावर भर देते. त्यामुळे या भौतिकवादाच्या युगात मानवी व्यक्तिमत्त्व आणि राष्ट्रीय चारित्र्याच्या विकासासाठी जैन राजकारणाचा अभ्यास करणे नितांत गरजेचे ठरते.

**संदर्भ -**

1. https://hi.wikipedia.org/wiki/कुलकर.
2. https://jainsite.com.
3. https://www.jainpuja.com.
4. कश्यप भिक्खू ज.,(1958), *"सुत्तपिटके दीघनिकायपालि"*,बिहार शासन.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 2, October 2024

5. जिनसेन& जैन पन्नालाल, (1963),*"आदिपुराण भाग 1"*,भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन काशी.
6. जैन जगदीशचंद्र & मेहता मोहनलाल, (1966), *"जैन साहित्य का बृहद इतिहास भाग 2"*, पार्श्वनाथ विद्याश्रम शोध संस्थान वाराणसी.
7. मुनि सुमन कुमार&शास्त्रीदामोदर, (2010),*"आवश्यकनियुक्ति गाथा भाग 1"*,आचार्य श्री सोहनलाल जैन ग्रन्थ प्रकाशन अम्बाला.
8. शर्मा एम. एल., (1971), *"नीतिवाक्यामृत में राजनीति"*, भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन.
9. शास्त्री नेमिचन्द्र, (1968), *"आदिपुराण में प्रतिपादित भारत"*,श्री गणेशप्रसाद वर्णी ग्रंथमाला वाराणसी.
10. हस्तिमल, (1971), *"जैनधर्म का मौलिक इतिहास, भाग 1"*,जैन इतिहास समिति, जयपुर.